# प्रेसनोट दि. ३१.०३.२०२१

**श्री. शिवप्रसाद अण्णासाहेब कोरे, वय ५७ वर्ष, वृक्ष अधिकारी/ उद्यान पर्यवेक्षक, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सांगली यांना ७५,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.**

---

तक्रारदार हे शासकीय कंत्राटदार असून त्यांनी म. न. पा. सांगली कार्यालयाकडून केलेल्या कामाचे बिल तयार काण्यासाठी श्री. शिवप्रसाद कोरे, उद्यान पर्यवेक्षक यांनी तक्रारदार यांचेकडे बिलाच्या रक्कमेच्या ५ टक्के रक्कम लाच म्हणून मागीतली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.३०.०३.२०२१ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयात दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक ३०.०३.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये लोकसेवक श्री. शिवप्रसाद कोरे, उद्यान पर्यवेक्षक, मनपा सांगली यांनी तक्रारदार यांनी केले कामाचे बिल तयार करण्या करीता बिलाच्या ५ टक्के प्रमाणे ७५,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दि.३१.०३.२०२१ रोजी उद्याने विभाग सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सांगली या ठिकाणी सापळा लावला असता श्री. शिवप्रसाद अण्णासाहेब कोरे, वय ५७ वर्ष, वृक्ष अधिकारी/ उद्यान पर्यवेक्षक, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून ७५,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने श्री. शिवप्रसाद अण्णासाहेब कोरे, वय ५७ वर्ष, वृक्ष अधिकारी/ उद्यान पर्यवेक्षक, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सांगली यांचे विरुध्द सांगली शहर पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुहास नाडगौडा सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक,श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक, श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार अविनाश सागर, सलीम मकानदार, संजय संकपाळ, भास्कर भोरे, संजय कलकुटगी, धनंजय खाडे, प्रितम चौगुले, रविंद्र धुमाळ, राधिका माने, सिमा माने, विना जाधव, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in